करावयाची असुन लिहुन घेणार यांना देखील सदर भागातच राहण्यासाठी फ्लॅटची आवश्यकता असल्याने लिहुन घेणार यांना लिहुन देणार यांचे इमारतीचे बांधकामाची माहिती झाली. त्यांनी लिहुन देणार यांना मिळालेल्या मालकी हक्काबद्दलची,मिळालेल्या परवानग्यांची व सर्व कागदपत्रांची पाहणी करुन स्वतःची खात्री झालेनंतर आपसात बोलणी करुन अटी व शर्ती ठरवुन कलम 1ब मध्ये वर्णन केलेली मिळकत खरेदी करण्याचे ठरवुन त्यानुसार प्रस्तुतचा करारनामा लिहुन देणार हे लिहुन घेणार यांचे लाभात खालील अटी व शर्तीवर आजरोजी लिहुन व नोंदवुन देत आहेत.

**-ःअटी व शर्तीः**

1) **मिळकतीची किंमतः-** कलम 1ब मध्ये वर्णन केलेल्या बांधीव मिळकतीची किंमत लिहुन घेणार व लिहुन देणार यांचे दरम्यान रक्कम **रु. /- ( अक्षरी रक्कम रुपये मात्र )** अशी उक्ती ठरलेली आहे. मिळकतीची परीस्थिती,प्रचलित बाजार भाव वैगरे बाबींचा विचार करता ठरलेली किंमत ही योग्य व बरोबर अशी आहे. सदरील किंमत उभयतांस मान्य व कबुल असुन किंमतीबाबत उभयतांमध्ये कोणत्याही प्रकारचा वाद अगर तक्रार नाही.

2) **किंमतीचा भरणाः-** वर कलम 1ब मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या किंमतीचा भरणा हा लिहुन घेणार यांनी मिळकतीचे क्षेत्राचे मोजमाप करुन घेऊन किंमत ठरविलेली आहे. तसेच क्षेत्राबाबत व किंमतीबाबत उभयंतामध्ये कोणताही वाद अथवा तक्रार नाही. लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यांना खालील परिशिष्टात नमुद केल्या किंमतीचा भरणा प्रमाणे द्यावयाचा आहे.

| भरण्याचे प्रमाण | तपशिल |
|---|---|
| 50 % | आरसीसी 100% काम पुर्ण झाल्यानंतर |
| 15% | विट बांधकाम 50% काम पुर्ण झाल्यानंतर |



| | |
|---|---|
| 10% | विट बांधकाम 100% काम पुर्ण झाल्यानंतर |
| 10% | प्लास्टरचे काम सुरु केल्यानंतर |
| 10% | फ्लोअरींग काम सुरु केल्यानंतर |
| 5% | कब्जा देते वेळी |
| 100% | मिळकतीचे एकुण किंमतीचा संपुर्ण मोबदला |

आज पावेतो लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यांना खालील प्रमाणे भरणा दिलेला / द्यावयाचा आहे, सदरचा भरणा लिहून देणार यांस पावला आहे.

| रक्कम | तपशिल |
|---|---|
| रु. /- | अक्षरी रक्कम रुपये मात्रचा भरणा लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यांना , या बँके वरील चेक नं. दिनांक / / 2017 अन्वये अदा केलेला आहे. |
| रु. /- | अक्षरी रक्कम रुपये मात्रचा भरणा लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यांना , या बँके वरील चेक नं. दिनांक / / 2017 अन्वये अदा केलेला आहे. |
| रु. /- | अक्षरी रक्कम रुपये मात्रचा भरणा लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यांना कोणत्याही वित्तिय संस्था अथवा बॅकेकडुन कर्ज घेवुन बांधकामाच्या परिशिष्टात नमुद केल्या द्यावयाचे आहे. ही बाब उभयतांना मान्य व कबुल आहे. |
| रु. /- | **एकुण अक्षरी रक्कम रुपये मात्र** |

Scanned by CamScanner